# चांगली दुर्कस मरण पावली आणि पुन्हा जिवंत झाली

पुढीलपैकी मुलांचे कोणतेही शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

**प्रार्थना:** "प्रिय प्रभु, मुलांना गरजू लोकांना मदत करून त्यांचे प्रेम व्यक्त करण्याकरीता मदत कर.

**कृत्ती:** शक्य असल्यास भुकेल्या व्यक्तीला खायला देण्याचे हे चित्र मुलांना रंगवायला सांगा.

मोठया मुलांने किंवा शिक्षकांनी **प्रे. कृ. 9:32-42** मधून दुर्कसचा कथावृत्तांत्त वाचून दाखवा किंवा सांगा आरंभीच्या ख्रिस्ती लोकांनी गरीबांची कशी काळजी घेतली ते यावरून दिसते.



कथावृत्तांत सांगून झाल्यावर पुढील **प्रश्न विचारा** *(प्रत्येक प्रश्नापुढे उत्तर दिलेले आहे.)*

- दुर्कस कशा प्रकारची व्यक्ती होती? *(पाहा वचन 36)*
- ती मरण पावली तेव्हा विश्वासणाऱ्यांनी काय केले? *(पाहा वचन 38)*
- खोलीमध्ये कोण रडत होते? *(पाहा वचन 39)*
- गरीब लोकांना दुर्कसविषयी काय वाटले? *(पाहा वचन 39)*
- दुर्कसला जिवंत करण्यापूर्वी पेत्राने काय करण्यास सांगितले? *(पाहा वचन 40)*
- ह्या अद्‌भुत चमत्काराचा परिणाम काय झाला? *(पाहा वचन 42)*

गरजूंची सेवा करण्याच्या भूमिकेचा सराव करा.

- मुले गरजू लोकांबद्दलचे प्रेम प्रत्यक्षात कसे व्यक्त करतील हे त्यांना नाट्यरूपाने दाखवायला सांगा.
- पुढील भूमिका करण्यासाठी काही मुलांची निवड करा *(सर्व भूमिका केल्या नाहीत तरी चालेल)*

    1. **भूकेली विधवा**
    2. **एकाकी अनाथ**
    3. **निराश कैदी**
    4. **थकलेला प्रवासी**
    5. **आजारी शेजारी**
    6. **हरवलेले मूल ह्याला घरची वाट सापडत नाही.**
    7. **विश्वासणारे हे ह्या गरजू लोकांची भेट घेतात.**

- प्रत्येक गरजू व्यक्तीने विश्वासणाऱ्यांना आपआपली समस्या सांगावी. मग अशा प्रकारचे लोक प्रत्यक्षात भेटतील तेव्हा मुले काय म्हणतील ते त्यांनी सांगावे.
- मुलांना उदाहरणे देता आली नाहीत तर पुढील गोष्टी सुचवा:

    1. विधवेला जेवण द्या.
    2. अनाथासाठी घर आसरा शोधा
    3. कैघांची भेट घेऊन त्याला धीर द्या.
    4. प्रवाशाला झोपायला जागा द्या.
    5. आजाऱ्यांसाठी प्रार्थना करून त्यांची काळजी ध्या.
    6. हरवलेल्या मुलाला घरी न्या.



दुर्कसच्या कथावृत्तांताचे प्रे.कृ. 9:32-42 मधून नाट्यीकरण करा.

मंडळीच्या उपासनेच्या कमी महत्वाचा कथा वृत्तांतामधील भाग वगळा.

- पुरेशी मुले नसतील तर मोठया माणासांची मदत घ्या.
- सर्वांचे संवाद व्यवास्थित पाठ होईपर्यन्त सराव करा.
- निवेदक कथावृत्तांताचा भाग वाचून दाखवतील तेव्हा भूमिका करणाऱ्यांनी पवित्र शास्त्रातील व्यक्तींचे शब्द बोलून कृती करावी.
- मोंठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.
- मोठया मुलांनी किंवा प्रौढांनी पेत्र निवेदक आणि दुर्कस ह्या भूमिका करण्यात. दुर्कसकडे सुई दोरा व कापड ह्या गोष्टी असाव्यात
- लहान मुलांनी यापो येथील शिष्य आणि विधवा ह्या भूमिका कराव्यात

**निवेदक:** प्रे. कृ. 9:32-42 मधून दुर्कसचा कथावृत्तांत वाचा किंवा सांगा आणि म्हणा, "दुर्कस विधवा स्त्रियांना काय सांगत आहे ते ऐका."

**दूर्कस:** म्हणा, "मैत्रीणींने पाहा भी तुमच्याकरीता हे कपडे शिवले आहेत तुम्हांला याची गरज आहे हे मला ठाऊक आहे."

**विधवा:** "बरे झाले दुर्कस तुला खूप खूप धन्यवाद." "तू गरजूना मदत करण्यास नेहमीच पुढे असतेस."

**दुर्कस:** हातात डोके धरून खाली झोपा माग म्हणा, "मला बरे वाटत नाही, मी जरा पडते" (खाली झोपा)

**शिष्य:** पेत्राकडे जाऊन म्हणा, "कृपा करून या! दुर्कस मरण पावली!

**पेत्र:** दुर्कसच्या आसपास उभे राहून रडणाऱ्या विधवा स्त्रियांकडे लागबगीने जा विधवांना त्या खोलीतून बाहेर जाण्यास सांगा. तिला जिवंत करण्यासाठी देवाकडे विनंती करा मग म्हणा, "दुर्कस उठ."

**दुर्कस:** उठून बसा आणि इकडे तिकडे पाहा.

**विधवा स्त्राया व शिष्य:** एकत्रितपणे देवाची स्तुती करा.

**निवेदक वा मोठे मूल:** मदत करणाऱ्या सर्वांचे आभार माना.

मुलांनी ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर त्यांनी वरील प्रश्न मोठया माणसांना विचारावेत.

मुलांना फ्रॉकचे चित्र काढायला सांगा. उपासनेच्या वेळी त्यांनी हे चित्र मोठया माणसांना दाखवून स्पष्ट करावे की गरजू लोकांना दुर्कसने कशी मदत केली हे यावरून दिसते.



**मुलांना विचारा:** आणखी कोणत्या मार्गांनी आपल्याला गरजूंची सेवा करता येते? मुलांनी व प्रौढांनी उत्तरे द्यावीत

**कविता:** चार मुलांना नीतिसूत्रे 11:16, 24, 25 व 28 ही वचने प्रत्येकी एक याप्रमाणे म्हणायाल सांगा.

**पाठ करा मत्तय 25:40**

गरीबांची सेवा करणे विषयावर मोठया मुलांनी कविता गाणी किंवा नाटिका लिहाव्यात.

**प्रार्थना:** "प्रिय प्रभू अनाथ, विधवा आणि सर्व गरजू लोकांची काळजी घेण्यास आमचे साहाय्य कर तुझ्यासारखी त्यांच्या प्रीती करण्यास आमची मदत कर. दुर्कस प्रमाणे त्यांची सेवा कशी करायची हे आम्हांला दाखव."

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net